# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३५६-२२** **दिनांक २६/११/२०२२**

## घरफोडी चोरी करणा-या आंतरराज्यीय टोळीतील सराईत आरोपीतांना अटक करुन एकुण ८,६८,५००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत-काशिमीरा पोलीस ठाण्याची कामगिरी.

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दिमध्ये राहणारे तक्रारदार प्रविण दिगंबर शेटये हे त्यांच्या मुलाचे लग्नाचा हॉल बघण्यासाठी गेले असतांना दिनांक ०५/११/२०२२ रोजी दुपारी १४.३० वा. ते १६.३० वा. या दोन तासाच्या दरम्यान त्यांचे रुम नं १४, न्यु श्री. गणेशकृपा सोसायटी, अमर पॅलेस जवळ, काशिमीरा, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे येथील घराच्या सेफ्टी दरवाजाचे कुलुप व मुख्य दरवाजाचे लॅच तोडून घरात प्रवेश करुन बेडरुममध्ये असलेल्या लोखंडी कपाटातील एकुण ७,३५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने व २,००,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ९,३५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात आरोपीतांनी घरफोडी चोरी करुन नेले होते. सदरबाबत काशीमीरा पोलीस ठाणे येथे I गुरनं ७७४/२०२२ कलम ४५४, ३८०, ३४ अन्वये दिनांक ०५/११/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध होऊन गुन्हा उघडकीस येण्याकरिता वरिष्ठ पोलीस अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि/प्रशांत गांगुर्डे व त्यांचे पथकाने नमुद गुन्हयांचे घटनास्थळाची पाहणी करुन प्राथमिक पुरावे हस्तगत केले असता माहिती मिळून आली की, आरोपीत हे गुन्हा करण्यासाठी गाझीयाबद व दिल्ली या ठिकाणाहुन येवुन गुन्हा केला असल्याचे समजून आहे. त्या अनुशंगाने पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ यांचे परवानगीने काशिमिरा पोलीस ठाण्याचे पथक गाजियाबाद याठिकाणी जावुन आरोपीत नामे हबीब हाफिज सैफी वय ४५ वर्षे,रा.-बेहटा हाजिपुर, गाझीयाबाद, रा. उत्तर प्रदेश हा राहत असलेल्या परिसरात सलग ०२ दिवस वेशभुषा बदलुन सापळा रचुन दि. १२/११/२०२२ रोजी बेहटा, हाजिपुर, जिल्हा गाझीयाबाद, राज्य उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेवुन त्याला नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. पोलीस कोठडी दरम्यान आरोपीताने सदर गुन्हा हा त्याचे साथीदार आरोपीत १) रमेश ऊर्फ कालु बैसाखीराम राजपुत व २) अकबर सुलतान सैफी दोन्ही रा. नवी दिल्ली यांचे सोबत मिळुन केला असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीत रमेश ऊर्फ कालु बैसाखीराम राजपुत यास शाहदरा, नवी दिल्ली परिसरात सलग ०४ दिवस सापळा रचुन दिनांक १९/११/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच गुन्हयातील चोरुन नेलेला मुद्देमाल आरोपीत रमेश राजपुत यांने त्याच्या परिचयाचा इसम दादासाहेब ऊर्फ पिंटू रामचंद्र मोहिते यांच्याकडे वितळविण्यासाठी दिली असल्याचे सांगितल्याने २२० ग्रॅम. (२२ तोळे) वजानाची सोन्याची लगड त्याच्याकडुन पंचनाम्यान्वये हस्तगत करण्यात आली आहे.

वरील नमुद गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या ९,३५,०००/- रुपयाच्या मुद्देमालापैकी आरोपीतांकडून गुन्ह्याचे तपासादरम्यान २२० ग्रॅम. (२२ तोळे) वजानाचे एकुण ७,३५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने व १,३३,५००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ८,६८,५००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हा करतेवेळी आरोपीतांनी कोणताही पुरावा मागे न ठेवता देखील गुन्हा दाखल झाल्यापासुन गुन्ह्याचे घटनास्थळाची मिळुन आलेल्या तांत्रिक बार्बीचे विश्लेशन करुन तसेच सलग १३ दिवस दिल्ली व उत्तरप्रदेश येथे वेशभुषा बदलून सापळा रचुन आरोपीताना अथक प्रयत्नान्वये अटक करुन गुन्हयातील मालमत्ता हस्तगत केली आहे.

सदर कामगिरी श्री जयंत बजबळे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ – ०१, श्री विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली काशिमिरा पोलीस

स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय हजारे, पोनि. श्री विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी/श्री प्रशांत गांगुर्डे, पोउनि निखिल चव्हाण, पो.उपनिरीक्षक(श्रेणी) श्री प्रकाश कावरे, पो.हवा.०६०३४ सचिन हुले, पो.हवा./०७१४१ हणुमंत तेरवे, पो.हवा./०७१३६ परेश पाटील, पो.हवा./०७१३९ निलेश शिंदे, पो.हवा./१००४९ सुधीर खोत, पो.हवा./१००५३ राहुल सोनकांबळे, पो.अंम./१२१०० रविंद्र कांबळे व पोहवा./०००२० जयप्रकाश जाधव (पो.उ.आ. कार्यालय,परीमंडळ १) सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.




----०००----